## नियमित दिवाणी दावा क्रमांक २४७/२०१६
## मधील निशाणी १५ वरील आदेश

(रामचंद्र परशराम पोतकुळे वि. मा. आयुक्त सांगली, मिरज आणि कुपवाड महानगरपालिका)

*****

१. सदरचा अर्ज ति–हाईत इसम गणपती अण्णाप्पा पोतकुळे वगैरे यांनी त्यांना या दावेकामी पक्षकार करुन घेणेकामी केलेला आहे.

२. त्यांचे कथनानूसार दाव्यात नमूद मिळकत असेसमेंट लिस्ट नं.४५६ व ३८८/१ याबाबतीत आहे. त्यात वादीने सदरची मिळकत वाडवडीलार्जीत आहे व ते त्यात प्रत्यक्ष वहिवाटदार आहेत असे कथन केले आहे. तसेच सदर मिळकतीमधील खुल्या जागेत भिंत पाडून त्या ठिकाणी नवीन भिंतीचे बांधका करीत असतांना महानगरपालिकेने त्यांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम (MRTP) चे कलम ५२ व ५३ नूसार नोटीस पाठवून त्यांच्या भिंतीचे बांधकाम थांबविलेवरुन वादीने प्रतिवादीविरुध्द सदरचा निरंतर ताकीदीचा दावा केलेला आहे. सदर ति–हाईत इसमाने त्यांच्या अर्जात वादीने दाव्यात दिशाभूल करणारे वाद मिळकतीमध्ये हक्क नसतांना, सदर वडीलोपार्जीत हक्काने मिळाली नसतांना, स्वतःचा अप्रामाणिक हक्क निर्माण करण्यासाठी सदर ति–हाईत इसमांचा त्या दावामिळकतीत मालकी हक्क असतांना त्यांना याकामी पक्षकार न करता केलेला असल्याने त्यांचा अर्ज मंजूर करणेबाबत विनंती केली आहे. तसेच दाव्यात नमूद भिंत ही येणेजाणेच्या व मोकळया जागेवर वादी बांधत असल्याने व दाव्यात भावकी हा शब्द हा सदर ति–हाईत इसमांनाच उद्देशून असल्याने व दाव्यात नमूद मिळकत ही ति–हाईत इसमांची असून ती त्यांना वडीलार्जीत हक्काने मिळालेली असून त्यात वादीचा वडीलार्जीत हक्क नाही त्यामुळे ते याकामी अत्यावश्यक पक्षकार आहेत. म्हणून खरी परिस्थिती समोर येणेसाठी त्यांना याकामी पक्षकार करुन घेणे गरजेचे असल्याने सदरचा अर्ज केलेला आहे.

३. सदर अर्जास वादीने निशाणी १८ कडे म्हणणे दाखल करुन ति–हाईत इसमांचा अर्ज नामंजूर करावा अशी मागणी केली आहे. वादीने त्याच्या म्हणण्यात सदर ति–हाईत इसमांचा दावा मिळकतीशी काहीही संबंध नाही. दावा मिळकत ही वादीच्या मालकी वहिवाटीची आहे. तसेच सदरचा दावा हा प्रतिवादींनी/महानगरपालिकेने वादीस पाठवलेल्या नोटीशीविरुध्द असल्याने त्यात

ति-हाईत इसमांचा काहीही संबंध नाही. सबब सदरचा अर्ज नामंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

४. अर्ज व त्यावरील म्हणणे, दावा व सोबतचे कागदपत्रे पाहिली. दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५. ति-हाईत इसमाने त्याना दावे कामी पक्षकार करणेकामी त्यांची दाव्यात कशाप्रकारे व का तसेच दाव्यात असलेला वाद विषय त्यांच्याशिवाय का चालू शकणार नाही या गोष्टी समोर आणणे गरजेचे आहे. तसेच जर त्यांना दावेकामी पक्षकार करुन न घेतल्यास, दाव्यात असलेला वाद विषय हा पूर्णपणे निकाली काढणे अशक्य होणार आहे हे समोर आणणे गरजेचे आहे. प्रस्तुत दाव्याचा वाद विषय पाहता वादीने सदरचा दावा प्रतिवादी महानगरपालिकेविरुध्द त्यांनी वादीस दिलेल्या नोटीशीवरुन तसेच त्यांनी गैरप्रकारे दाव्यात नमूद असलेली भिंत पाडणार असल्याच्या कथनावरुन दावा वादीच्या कब्जेवहिवाटीस बाधा येईल, वादीची कपौंड भिंतीचे पाडापाड करु नये अशी ताकीद प्रतिवादींच्या विरुध्द मागितली आहे. सदर कामी प्रतिवादी हे हजर झाले असून त्यांनी अदयाप कैफियत दाखल केली नाही.

६. वादीच्या वकीलांनी युक्तीवादा दरम्यान असा युक्तीवाद केला की, ति-हाईत इसमांनी त्यांच्या मागणीपुष्टर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी हजर केला नाही. तसेच ति-हाईत इसमानी त्यांच्या अर्जात नमूद केलेला मजकूर, दावा मिळकतीसंबंधी त्यांचे असलेले हक्क व अधिकार यासंबंधी वादीने त्याचे म्हणणेमध्ये स्पष्टपणे नकार दिलेला आहे. ति-हाईत इसमांचा दावामिळकतीशी किंवा दाव्यातील वाद विषयाशी कशाप्रकारे संबंध आहे हे त्यांनी दाखवून दिलेले नाही. तसेच प्रतिवादी यांच्याशी संगणमत करुन वादी हा सदरचा दावा चालवित आहे व त्यामुळे त्यांना यासंबंधी म्हणणे मांडण्याबाबत हक्क आहे, हे त्यांनी कथनही केलेले नाही वा त्यांनी तसा युक्तीवादही केलेला नाही. त्यामुळे ति-हाईत इसमांचा दाव्याशी काहीही संबंध नसल्याने तसेच वाद विषय त्यांच्या उपस्थितीतीशिवाय संपूर्णपणे निकाली काढणे अशक्य आहे हे ते दाखवू न शकल्याने सदरचा अर्ज नामंजूर करावा असा युक्तीवाद केला आहे. दाव्यात दाखल कागदपत्रे, दाव्यात नमूद वाद विषय, वादीची मागणी याचा एकत्रीत विचार करता, वादीच्या वकीलांचा युक्तीवाद योग्य वाटतो. ति-हाईत इसमांना त्यांना ज्या काही मागण्या करावयाच्या आहेत त्यासंबंधी ते स्वतंत्र दावा करु

शकतील. त्यांना अपेक्षित असलेल्या मागण्या याच दाव्यात चालवाव्या याबाबत त्यांच्या अर्जात अथवा युक्तीवादात तथ्य दिसून येत नाही. सबब, वरील सर्व विवेचनावरुन मी या निष्कर्षापर्यंत येत आहे की ति–हाईत इसमांचा अर्ज नामंजूर करणे क्रमप्राप्त होईल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

अर्ज नामंजूर करणेत येत आहे.

सही/–

ठिकाण –मिरज (निलेश एम.वाली )
दिनांक–२२.०९.२०१७. तिसरे सहदिवाणी न्यायाधीश,क.स्तर, मिरज.

*****